# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/डीबीटी-२०१८-१९/२०१९/ २३२२ दिनांक : 11 JUN 2019

**महत्वाची सूचना :**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
पुणे विभागातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या
अखत्यारीतील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /
खाजगी विना अनुदानित संस्था..

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी शेवटची मुदतवाढ ११ जून २०१९ ते ३० जून २०१९..**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अद्यापही काही पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी **शेवटची संधी म्हणून शासनाने दिनांक ११ जून २०१९ ते ३० जून २०१९ या कालावधीसाठी महाडीबीटी पोर्टल पुन्हा सुरु केलेले आहे.** तरी ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केलेले नाहीत, त्यांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज आवश्यक मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्याच लॉगीनमध्ये प्रलंबीत आहेत, त्यांनी त्रुटींची पूर्तता करुन संस्थेच्या लॉगीनमध्ये पाठवावेत.

तसेच सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी त्यांचे संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची छाननी उपरोक्त मुदतीत पूर्ण करुन संस्थेच्या लॉगीनमधून पुढे पाठवावेत.

**३० जून २०१९ नंतर संस्थेच्या लॉगीनमध्ये प्रलंबीत असलेले अर्ज ऑटो रिजेक्ट होणार आहेत याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ही शेवटची संधी आहे याची सर्व पात्र विद्यार्थी व संस्था यांनी नोंद घ्यावी.**

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\MAHADBT_2018-19\Circular of extension of date.docx